# Two Days Online Workshop on
# Google News Initiative Fact-checking and Verification

**Shivaji University, Kolhapur**

**Two Days Online Workshop on Google News Initiative**
**Fact-checking and Verification**

**Jointly Organized By**
**Department of Journalism and Mass Communication**
**&**
**Kolhapur Press Club, Kolhapur**

**Date & Time**

**29-30 JUNE 2021**

**11 AM TO 3 PM**

**Speaker**

**NUPUR SONAR**
Journalist, Researcher and Trainer

## Key Takeaway

- Understand Misinformation Landscape
- Learn How To Verify Photos & Videos
- How to Analyse &Verify Sources
- Effective Online Searchers
- Social Audits By Monitoring: Facebook, Twitter, Youtube &Websites

---

**Convener**

**DR. NISHA PAWAR**
Head,
Department of Journalism and Mass Communication Shivaji University, Kolhapur

Link for registration: https://forms.gle/9nFqfPuyrHULNyHb7

## Shivaji University, Kolhapur

# Two Days Online Workshop on Google News Initiative

## Fact-checking and Verification

**Jointly Organized By**

**Department of Journalism and Mass Communication**

**&**

**Kolhapur Press Club, Kolhapur**

### Day 1: 29 June 2021

| Time | Event Name |
|---|---|
| 11.00 to 11.05 am | Introduction & Welcome |
| 11.05 to 11.35 am | Understanding the Misinformation Landscape |
| 11.35 to 1.00 pm | How to Verify Photos |
| 1.00 to 2.00 pm | Lunch Break |
| 2.00 to 3.00 pm | How to Verify Videos |
| 3.00 to 4.00 pm | Verifying Geolocation |

### Day 2: 30 June 2021

| Time | Event Name |
|---|---|
| 11.00 to 11.30 am | Analysing and Verifying Sources |
| 11.30 to 1.00 pm | Effective online searches and boolean queries |
| 1.00 to 2.00 pm | Lunch Break |
| 2.00 to 4.00 pm | Social Audits by monitoring FB, Twitter, Youtube, websites |
| 4.00 to 4.10 | Feedback and Vote of Thanks |

**Sakal 29-06-2021**

# विद्यापीठात आज, उद्या ऑनलाईन कार्यशाळा

## प्रेस क्लब व जर्नालिझम विभागातर्फे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि प्रेस क्लबतर्फे गुगल मिटद्वारे मंगळवार(ता. २९) आणि बुधवार (ता.३०) रोजी 'गुगल न्यूज इनिशिएटिव्ह फॅक्ट चेकिंग अँड व्हेरिफिकेशन' या विषयावर दोनदिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेसाठी गुगल न्यूज इनिशिएटिव्हतर्फे नुपूर सोनार मार्गदर्शन करतील. यात माहिती, फोटो आणि व्हिडिओची सत्यता पडताळणी, बातमीचे स्त्रोत या विषयीचे विश्लेषण आणि पडताळणी करणे, फेसबुक, ट्विटर, यूट्यूब आणि वेबसाइट्स या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यशाळेसाठी https://forms.gle/9nFqfPuyrHULNyHb7 या लिंकवरून नाव नोंदणी करावी. त्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्राध्यापक, संशोधक, पत्रकार आणि विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त आहे.

या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

**Pudhari 30-06-2021**

# माहितीची सत्यता पडताळणे महत्त्वाचे

## नुपूर सोनार; शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोव्हिडच्या साथीबरोबरच अपमाहितीचीही (फेक न्यूज) मोठी साथ आल्यासारखी परिस्थिती सध्या आहे. पारंपरिक प्रसारमाध्यमांसह समाजमाध्यमांमधून माहितीचा भडिमार सुरू आहे. त्यात खरी माहिती पडताळून पाहणे सामान्य नागरिकांसाठी अवघड झाले आहे. अशावेळी इंटरनेटचा वापर करून खरी व खोटी माहिती वेगळी करावी, असे आवाहन दिल्ली येथील गुगल न्यूज इन्शेटिव्हच्या प्रशिक्षक नुपूर सोनार यांनी केले.



**विद्यापीठातून**

शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने माहितीच्या सत्य पडताळणीविषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. नुपूर सोनार यांनी कार्यशाळेत बातमीतील तथ्य तपासणी आणि व्हेरिफिकेशन या विषयावर सादरीकरणासह मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी फॅक्ट-चेकिंग, वेबसाइट्स, गुगल रिव्हर्स इमेज चेक, व्हिडीओ आणि जिओलोकेशन व्हेरिफिकेशन आदी साधने वापरून माहितीची सत्यता कशी तपासावी, हे उदाहरणांसह दाखवून दिले.

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी  कार्यक्रमाचे आयोजन केले. विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, सहयोगी प्राध्यापक चंद्रशेखर वानखेडे यांनी विशेष साहाय्य केले. विद्यार्थिनी वंदना रंगलानी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्याम तारके, आर. विनायक, अश्विनी कांबळे, डॉ. राजेंद्र भस्मे, अनुराधा इनामदार, डॉ. सुनील राजपूत आदी उपस्थित होते. दरम्यान, बुधवारी (दि.३०) कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी माहितीच्या सूत्रांची तथ्य पडताळणी, इंटरनेटचा प्रभावी वापर, फेसबुक, ट्विटर, यू ट्यूबवरील माहितीची पडताळणी व इतर विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

**Punyanagri 30-06-2021**

पुण्य नगरी

# माहितीची सत्यता पडताळणे महत्त्वाचे

## नुपूर सोनार; शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोविडच्या महासाथीबरोबरच अपमाहितीचीही (फेक न्यूज) मोठी साथ आल्यासारखी परिस्थिती सध्या जाणवत आहे. इंटरनेट युगात माहितीची सत्यता पडताळणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन दिल्ली येथील मुक्त पत्रकार आणि गुगल न्यूज इनिशेटिव्हच्या प्रशिक्षक नुपूर सोनार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने माहितीच्या सत्य पडताळणीविषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन गुगल मीटद्वारे ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यशाळेत बातमीतील तथ्य तपासणी आणि व्हेरिफिकेशन या विषयावर सादरीकरणासह त्यांनी मार्गदर्शन केले.

सोनार म्हणाल्या, पारंपरिक प्रसारमाध्यमांसह समाजमाध्यमांमधून आपल्यावर सतत माहितीचा भडिमार सुरू आहे. खरी माहिती पडताळून पाहणे सामान्य नागरिकांसाठी अवघड झाले आहे. अशा वेळी इंटरनेटचा वापर करून खरी आणि खोटी माहिती कशी वेगळी करावी, याचे सोनार यांनी मार्गदर्शन केले.

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार आणि कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. विभागाचे प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे आणि सहयोगी प्राध्यापक चंद्रशेखर वानखेडे यांनी यासाठी विशेष साहाय्य केले. विद्यार्थिनी वंदना रंगलानी यांनी आभार मानले. या कार्यशाळेला डॉ. श्याम तारके, आर. विनायक, अश्विनी कांबळे, जयप्रकाश पाटील, डॉ. राजेंद्र भस्मे, अनुराधा इनामदार, दिव्या कांबळे, डॉ. आनंद जरग, डॉ. सुनील राजपूत, औरंगाबाद येथील एमजीएम विद्यापीठ, कोल्हापूर येथील संजय घोडावत विद्यापीठ, शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय टिटवे, वारणा महाविद्यालय, एमआयटी पुणे या ठिकाणाहून १०० पेक्षा अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उपस्थिती दर्शवली होती.

## Sakal 30-06-2021

सकाळ

# माध्यमांनी सत्यता पडताळणे आवश्यक

### नूपुर सोनार यांचे प्रतिपादन; मास कम्युनिकेशन, प्रेस क्लबतर्फे कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २९ : इंटरनेटवरून माहितीचा भडिमार होत आहे. अशा काळात माध्यमांनी माहितीची सत्यता पडताळणे आवश्यक आहे; अन्यथा गैरसमज पसरतील. यासाठी विविध संकेतस्थळे, ॲप्लिकेशन उपलब्ध असून त्यांचा प्रभावी वापर केल्यास आपण खरे-खोटे करू शकतो, असे प्रतिपादन गुगल न्यूज इनिशिएटिव्हच्या प्रशिक्षक नूपुर सोनार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सोनार म्हणाल्या, ''कोविडच्या महासाथीबरोबरच अपमाहितीचीही (फेक न्यूज) मोठी साथ आल्यासारखी स्थिती सध्या जाणवत आहे. पारंपरिक प्रसारमाध्यमांसह समाजमाध्यमांमधून आपल्यावर सतत माहितीचा भडिमार सुरू आहे. त्यात खरी माहिती पडताळून पाहणे सामान्य नागरिकांसाठी अवघड झाले आहे. अशा वेळी इंटरनेटचा वापर करून खरी आणि खोटी माहिती वेगळी करणे आवश्यक आहे. फॅक्ट-चेकिंग वेबसाइट्स, गुगल रिव्हर्स इमेज चेक, व्हिडिओ आणि जिओलोकेशन व्हेरिफिकेशन आदी साधने वापरून माहितीची सत्यता तपासता येऊ शकते. माध्यमात काम करणाऱ्यांनी याचा प्रभावी वापर केला पाहिजे.''

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार आणि कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे आणि सहयोगी प्रा. चंद्रशेखर वानखेडे यांनी यासाठी विशेष साहाय्य केले.

Kolhapur, Kolhapur-Today
30/06/2021 Page No. 2

## Sakal 01-07-2021

सकाळ

# माहितीची सत्यता पडताळणे महत्त्वाचे : सोनार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : माहिती स्रोताचे विश्लेषण आणि सत्यता पडताळणी, प्रभावी ऑनलाईन शोध कसा करावा, आदी विषयांवरील चर्चासत्राने माहितीच्या सत्य पडताळणीविषयी दोनदिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला. शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्यातर्फे गुगल मीटद्वारे ऑनलाइन पद्धतीने शिबिर झाले.

दिल्ली येथील मुक्त पत्रकार आणि गुगल न्यूज इनिशेटिव्हच्या प्रशिक्षक नुपूर सोनार यांनी कार्यशाळेत बातमीतील तथ्य तपासणी आणि पडताळणी या विषयावर सादरीकरणासह मार्गदर्शन केले. बुधवारी कार्यशाळेचा शेवटचा दिवस होता. चंद्रशेखर वानखेडे, डॉ सुमेधा साळुंखे यांनी प्रस्तावना केली. माहितीच्या सूत्रांची तथ्य पडताळणी, इन्टरनेटचा प्रभावी वापर, फेसबुक, ट्वीटर, युट्युबवरील माहितीचे पडताळणी आणि विषयावर विवेचन झाले. नुपूर सोनार यांनी कार्यशाळेमध्ये सहभागी विद्यार्थी शिक्षक पत्रकार संशोधकांचा शंकांचे निरसन केले. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार,प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी आयोजन केले.

प्रा डॉ. शिवाजी जाधव, डॉ. साळुंखे, प्रा. वानखेडे यांनी विशेष साहाय्य केले. ९० जणांनी या शिबिरात सहभाग घेतला. निहारिक देशपांडे यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
01/07/2021 Page No. 2